अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०१/०९/२०२४

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २५/२०२४. |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. कलम २३८ भारतीय न्याय संहिता २०२३ |
| आरोपी लोकसेवक | श्री. प्रल्हाद मच्छिंद्र शितोळे, ४३ वर्षे, वरिष्ठ केंद्र अधिकारी, अग्नीशामक दल, न्यू लिंक रोड, दहिसर पश्चिम, मुंबई ६८ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ८०,०००/- तडजोडीअंती रू. ५०,०००/- पेक्षा जास्त काही रक्कम वाढवून |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ६०,०००/- |
| हस्तगत लाचेची रक्कम | रू. ५७,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे खाजगी कंपनीत लायजनिंग ऑफिसर म्हणून काम करतात. बोरीवली पश्चिम येथील एका हॅाटेल मालकाने त्यांच्या हॅाटेलच्या पीएनजी कनेक्शन व नाहरकत प्रमाणपत्राचे काम तक्रारदार यांना दिले होते. तक्रारदार यांनी नमूद कामाकरीता बृहन्मुंबई फायर ब्रीगेड पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केला होता. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. प्रल्हाद शितोळे, वरिष्ठ केंद्र अधिकारी यांची त्यांचे कार्यालयात जावून भेट घेतली असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांनी अर्ज केलेल्या हॅाटेलला जावून साईट व्हिजीट केली. नमूदवेळी लोकसेवक यांनी पीएनजी कनेक्शन व नाहरकरत प्रमाणपत्र देण्याकरीता त्यांचे मोबाईलच्या कॅलक्युलेटरवर १.३० टाईप करून तक्रारदार यांचेकडे रू. १,३०,०००/- इतकी लाचेची मागणी केली. सदरची बाब तक्रारदार यांनी त्यांचे कंपनीचे साहेबांना सांगितली असता, त्यांनी सदरची रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी दिनांक २८/०८/२०२४ रोजी लोकसेवक यांची पुन्हा भेट घेतली असता, लोकसेवक यांनी पुन्हा मोबाईलच्या कॅलक्यूलेटरवर ८० टाईप करून रू. ८०,०००/- इतक्या लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २९/०८/२०२४ रोजी ला.प्र.वि. मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरूध्द तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/०८/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे पीएनजी कनेक्शन व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता रू. ८०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. ५०,०००/- पेक्षा काही जास्त रक्कम स्विकारण्याचे मान्य करून लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यानुसार दिनांक ३०/०८/२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी लाचेची रक्कम कार्यालयाच्या लिफ्ट मध्ये स्विकारली. परंतू लोकसेवक यांना संशय आल्याने त्यांनी स्विकलेली लाचेची रक्कम नष्ट करण्याच्या हेतूने स्वत:चे घरी जावून लाचेची रक्कम शौचालयात टाकून फ्लश केली. लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने सदरहू लाचेची रक्कम इमारतीच्या ड्रेनेज चेंबर मधून शोधून काढली असता, स्विकारलेल्या रक्कमेपैकी रू. ५७,०००/- इतकी लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली. म्हणून श्री. प्रल्हाद मच्छिंद्र शितोळे, वरिष्ठ केंद्र अधिकारी, अग्नीशमन दल, दहिसर पश्चिम, मुंबई यांच्याविरूध्द ला.प्र.वि. मुंबई येथे कलम ७ भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलम २३८ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
**टोलफ्री क्र.** १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net